१९५३

# सुगन्ध-वारा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२५६०.

REFBK-0008079
REFBK-0008079

— प्रताप



# सुगंध वारा

— प्रताप —

# सुगन्ध-धारा

खंडकाव्यात्मक प्रेमकथा

कवि :- प्रताप

प्रस्तावनाकार

डॉ. वि. म. कुलकर्णी.
M. A. Ph. D.

रचनाकाल :- ११-५-५३ ते ३१-७-५३

प्रथमावृत्ति ) (किंमत २ रुपये

REFBK-0008079
नौं. दि.
वाचनालय शाखा
C.O.G.C.


प्रकाशक :- गोपाल लक्ष्मण जमदाडे M.A.
दुधोंडी ( व्हा. किर्लोस्करवाडी )
जि. द. सातारा.

मुद्रक :-
रत्नाकर प्रकाशन लिमिटेडचे रत्नाकर मुद्रणालय, मिरज

[ भाषान्तर, रूपान्तर, ध्वनिमुद्रण, चित्रपटकथा
वगैरेचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

माझे आवडते व प्रेमळ गुरुजी—



—श्री. रा. द. वाकणकर

यांनाः कृतज्ञतापूर्वक समर्पण.

# माझें निवेदन

The path of true love
Never did run smooth
-- Shakespeare

सुगंध-वाऱ्याच्या शीतल लहरींच्या रूपानें-पुस्तकरूपानें शारदा मंदीरांत मी हें पहिलेंच पाऊल टाकीत आहे. त्याचप्रमाणें स्फुट कविता संग्रह प्रसिद्ध करण्याच्या अगोदर, प्रदीर्घ काव्यरचना या दृष्टीनेंहि हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. रसिकांनीं त्याचें योग्य तेंच कौतुक करावें व टीकाकारांनीं गुणदोष दाखवावेत अशी माझी अपेक्षा आहे.

'सुगंध-वारा' ही एक प्रेमकथा आहे. दोन मुग्ध मनांची ही एक स्निग्ध कथा आहे. प्रेम भावनांचे हेलकावे व नायकाचें व्यक्तिमहात्म्य या दोन विषयांनीं ही भावकथा तयार झाली आहे. सरस्वतीच्या पवित्र मंदिरांत जी गोष्ट वास्तविक घडूं नये; ती या कथेंत घडली आहे. पंतोजीपासून प्राध्यापकापर्यंत अशीं अनेक उदाहरणें दाखवतां येतील कीं त्यांनीं शालेय, महाविद्यालयीन वातावरणांत प्रेम केलें आहे. कचित् लग्नेंहि झालीं आहेत. अशा गोष्टी त्याज्य असल्यातरी त्या घडत असतात हें मुळींच नाकारतां येणार नाहीं !

काव्यसृष्टींतील प्रस्तुत कथेंत हीच गोष्ट एका ध्येयवादी शिक्षकाच्या जीवनांत घडली असल्याचें दाखविलें आहे. प्रेम-कथा म्हणजे शृंगाराची धमाल असा एक समज रूढ होऊं पहात आहे; परंतु प्रेमकथाहि हृद्य व सदभिरुचीला आवाहन करणाऱ्या असूं शकतात असें जर वाचकांना शेवटीं वाटलें तर माझ्या या प्रयत्नाचें साफल्य झालें असें मी कृतज्ञतापूर्वक म्हणेन.

वाङमय आणि जीवन यांची परस्परांत नेहमीं देवाण घेवाण चाललेली असते; ती कदापि टाळतां येणार नाहीं. जीवनांत जें स्पृहणीय आहे, नवीन आहे, सुंदर आहे त्यासाठीं वाङमय हापापलेलें असतें. तद्वतच वाङमयांत जें स्पृहणीय, नवीन, सुंदर असतें त्याचें अनुकरण करण्याचा प्रयत्न जीवन करीत असतें. जीवनापेक्षां वाङमयाजवळ एक गोष्ट अधिक असतें- ती म्हणजे रम्य अशा काल्पनीयाची जोड. म्हणूनच वाङमय आपणांस वाचावें असें वाटतें. वाङमय म्हणजे सत्याचा हुबेहूब ' पंचनामा ' नव्हे; किंवा केवळ काल्पनीयाचें मायावी स्वप्नहि नव्हें; तर तें एक सत्याभासाचें रमणीय स्वरूप असतें. चुनखडीचे गोटे जसे अनेक ठिकाणांहून एकत्र करावें लागतात व त्यांचा परिपाक जसा कळीच्या चुन्यांत केला जातो त्याप्रमाणें सत्याभासात्मक सत्यसुद्धां अनेक अनुभवांच्या मिलाफानें तयार केलें जातें व त्यांत काल्पनीयता मिसळल्यानंतर जी कलाकृति कवि वा लेखक तयार करत असतो तींत वाङमयीन सत्य असतें.

'सुगंध वारा' ही कथा वाङ्मयीन सत्य आहे. कथा, प्रसंग व पात्रें हीं वाङ्मयीन सृष्टींतील आहेत. सत्य सृष्टींतील नव्हेत. पार्श्वभूमीसाठीं मात्र कात्रज व खंडाळा या घाटांमधील रम्य प्रदेशाची योजना केली आहे. पावसाळ्यांत हा भाग निसर्ग- सौंदर्यानें रमणीय वाटतो. तरीसुद्धां काव्यांतील सुरंगा नदी जगाच्या नकाशांतहि सांपडणार नाहीं. शैवगिरी कुठल्याहि भूगोलांत आढळणार नाहीं. सत्याजी- सतीची प्रेमकहाणी कुठल्याहि इतिहासांत नमूद नाहीं, आणि यामुळें काव्यांत अद्भुतता निर्माण करण्यास मदत झाली आहे.

विचारे गरीब शिक्षक! 'मुकीं विचारीं कुणी हका' अशी त्यांची लाचारीची लाजिरवाणी अवस्था पदोपदीं दिसून येते! शिक्षकांना जणु आत्माच नाहीं – स्वाभिमान नाहीं– नव्हे शिक्षणक्षेत्रांत तो एक दुर्गुण ठरूं पहात आहे. आणि अशा शिक्षकांकडून म्हणे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ (!) निर्माण केले जाणार आहेत. अशा अवमानित गुलामगिरीला आणि लब्ध प्रतिष्ठिताच्या ढोंगाला नायकानें ठोकर दिली आहे.

'सुगंध वारा' वाचकांपर्यंत पोहचिवण्याचें सारें श्रेय माझ्या अनेक जिवाभावाच्या मित्रांना आहे. त्यांनीं जर आर्थिक जबाबदारी घेतली नसती तर हें प्रकाशन इतक्या लौकर झालें नसतें. त्यांचे आभार मानणें त्यांना आणि मलाहि आवडणार नसल्यानें त्यांचा नामनिर्देश करणें कठीण झालें आहे.

माझे कलावंत चित्रकार स्नेही श्री. ग. ना. जाधव यांनीं आपल्या कुशल कुंचल्यानें मुखपृष्ठावरील चित्र अप्रतिम काढलें आहे; हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

डॉ.वि.म.कुलकर्णी M. A. Ph D. यांचा माझा फारसा परिचय नसतांना माझ्या विनंतीप्रमाणें त्यांनीं प्रस्तावना देण्याचें आगत्य दाखविलें आणि कांहीं सूचना दिल्या याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांना वेळ असता तर त्यांनीं सवि-स्तरपणें विवेचन केलें असतें; व धांवती आणि विवाद्य मोघम विधानें राहिलीं नसतीं; पण त्याला आतां इलाज नाहीं.

इंग्रजी पाचवींत असतांना ज्यांचें मला मार्गदर्शन लाभलें व ज्यांनीं माझ्या काव्याचें लालन पालन केलें ती आदरणीय व्यक्ति म्हणजे माझे ध्येयवादी व कर्तव्यनिष्ठ गुरुजी श्री. ग. द. वाकणकर हे होत. त्यांना माझी ही पहिली वहिली कलाकृति अर्पण करण्याची संधि लाभली हें मी माझें भाग्य समजतों.

कुणाहि कवीशीं स्पर्धा करावी या भावनेनें प्रस्तुत काव्य लिहिलेलें नाहीं. काव्याच्या दृष्टीनेंच सुगंध- वाऱ्याचें परीक्षण टीकाकार करोत. या खंडकाव्याच्या योगानें खंडकाव्य-प्रकारांत मोलाची भर घातली गेली कीं नाहीं हें अजमावित बसण्यापेक्षा फूल ना फुलाची पाकळी शारदेला वहिल्याचेंच मला समाधान वाटत आहे.

— प्रताप

## प्रस्तावना ............

मराठींत अलीकडे खंडकाव्याची निर्मिति फारशी होतांना दिसत नाहीं. भावकाव्य आणि तेंही उत्तम प्रतीचें, आजकाल अनेक कवि लिहीत आहेत. श्री. प्रताप या, काव्यप्रांतांत नव्यानेंच उतरलेल्या, कवीनीं " सुगंध - वारा " ही दीर्घ कलाकृति वाचकांना सादर केली आहे.

प्रदीर्घ रचनेचें, व प्रणयकथेचे धागे असलेलें खंडकाव्य हा रविकिरण मंडळाचा एक खास अलंकार होता. " सुगंध-वारा " रचनातंत्राच्या दृष्टीनें " सुधारक " या कविवर्य माधव ज्यूलियन यांच्या खंडकाव्यासारखा आहे. श्री. प्रतापांनीं दीर्घ रचनेचा प्रयोग करून काव्यप्रांतांत ही थोडीशी धिटाईच दाखविली आहे ! परंतु दक्षिण साताऱ्याकडे लहानशा गांवीं राहून त्यानीं काव्यरचनेबद्दल जें प्रेम दाखविलें आहे व जे परिश्रम घेतले आहेत ते कौतुकास्पद होत.

" सुगंध-वारा " काव्य दोनतीनच व्यक्तींच्या स्वभाव-चित्रांना वाव देतें. तें सुखांत आहे. त्यांत प्रणयी जोडप्याचें अखेरीस मीलन होतें. नायक-नायिका पुण्याच्या पर्वतीवरून टेक-डिवर फिरायला जातात असा शेवट आहे. हें तर सारें मराठी

काव्य वाङ्मयांत चावून चिकट झालें आहे असें म्हटलें जाईल. तथापि या काव्यांत प्रतिबिंबित होणारा एकप्रकारचा निकोपपणा मला लक्षणीय वाटला.

कवीनें यांत मुकुंद मोरे व सुगन्धा किबे या सुशिक्षित नायक नायिकेच्या आंतरजातीय प्रेमविवाह रंगविला आहे.

या विवाहाच्या आड येणारे कलिपुरुष सुगंधाचे मामाच आहेत. अर्थात् ते या विवाहाला मोडता घालतात तो, सुगंधा आपल्या बी. ए. झालेल्या मुलाला मिळावी म्हणून घालतात. त्यामध्यें जातियतेची बाजू घेऊन लढण्याचा कांहीं प्रकार नाहीं.

यांतील मुकुंद मोरे या नायकाचें चित्र चांगलें उतरलें आहे. तो माननीय भाऊरावांच्या शाळेंत शिकलेला आहे. त्याना वंदनीय मानणारा आहे. त्यांच्या तडफदार स्वभावाला कांहीं कुबट कुंपणें सहन होत नाहींत. दोनदां त्याचें जीवितसाधन जी नोकरी तिच्यावर गदा येते, परंतु तो मुळींच डगमगत नाहीं, भीत नाहीं. उलट न्यायदेवतेपुढें जाऊन आपली बाजू खणखणीतपणें तो सिद्ध करतो.

मुकुंद मोरे स्वाभिमानी व ध्येयनिष्ठ आहे. समाज अज्ञानांत आहे हें पाहून तो शिक्षणाचा पेशा पत्करतो. शिकवणें हा त्याचा धंदा नसून धर्म होता. ज्ञानप्रसारा चें पवित्र कार्य तो करूं पाहतो.

दामापुरतें काम करावें
वितभर पोटासाठिं जगावें
मोजिव, मापिव, जोखिव जगणें
ध्येयदृष्टिला कसें रुचावें ?

जाउन शाळेच्या शेतावर
काम करी तो मुलांबरोबर
' मळेल कपडा ' ' चुरेल इस्त्री '
कधीं न मनिं ये असा विचार.

हें त्याचें वैशिष्ट्य होतें.

खेडोंपाडीं वसणारी दरिद्री, अडाणी जनता हीच त्याचा परमेश्वर होती. " जनता म्हणजे त्याचा ईश्वर. " अशी स्थिति होती. जागृत नव्या पिढीचा मुकुंद मोरे कविही आहे. परंतु श्री. प्रतापांनीं त्याचें चित्र तसें तथाकथित भावनाप्रधान रेखाटलेलें नाहीं.

सुगंधा किबे व तिची आई वेणाई यांचेंहीं स्वभावचित्रें मन वेधून घेतात. तथापि सुगंधाचें चित्र ' रम्याद्‌भुत ' पठडीतलें आहे असें वाटतें. ती कार्तिकांतलें मदिर चांदणें देहावर नाचविणारी आहे. " अवतरली जणुं मूर्ति रतीची " अशी आहे ! तिला ललितकलांची आवड आहे. त्यांतही काव्याची विशेष. मुकुंदाचीच कविता तिची ( परिचया आधींच ) प्रिय बनलेली असते ! मात्र सुगंधाचें एकनिष्ठ प्रेम व मामाच्या विरोधाला न जुमानणारा तिच्या मनाचा कणखरपणा लक्षणीय आहे.

या खंडकाव्याच्या कथारचनेंत दिसतात त्याहून अधिक वास्तव दृश्यें असतीं तर तें अधिक परिणामकारी झालें असतें. मामानें नायकावर खटला भरणें नायिका आजारी पडणें, तिनें साक्ष देणें. पुनश्च नायकानें खलपुरुषावर खटला भरणें इत्यादि प्रसंग तितके प्रत्ययकारी वाटत नाहींत.

कथानकाच्या विकासांत योग्य स्थळीं योजलेलीं कांहीं भावकाव्यें सुरेख उतरलीं आहेत काव्यांत अनुषंगानें आलेली समाजटीकाहीं चुरचुरीत आहे.

एके ठिकाणीं, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संधिसाधु जनांनीं स्वार्थ कसा साधला हें वर्णितांना कवि म्हणतो,

लढा संपला कुणी कुणी पण
देशभक्तिचें पीक काढलें

कुणी काढुनी दुकान म्हणतीं
"कार्य न अपुलें अजुनि संपलें!"

कुणाकुणावर झाले खटले
कुणी सटकलें -- कुणी अटकलें

झाकायाला स्वार्थ, पाप अन्
खादी कापड स्वस्त जाहलें!

श्री. प्रताप यांच्या प्रस्तुत काव्यरचनेंत वरीलप्रमाणें स्मरणांत राहण्याजोगीं कांहीं अन्यही मार्मिक स्थळें आहेत सातार्‍याच्या कडे-पठारावरचा हा सुगंध-वारा त्यांत कांहीं उणीवा असल्यातरी-काव्यप्रांतांतील नेहमींच्या झुळुकांपेक्षा वेगळा वाटतो व मनाला थोडें तजेलदार बनवितो यांत संशय नाहीं. यांतील नवेपणाचें व निकोपपणाचें स्वागत असो.

दयानंद कॉलेज
सोलापूर
१०-१-५४

— वि. म. कुलकर्णी

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| (१) | थोडें आधीं ... ... | ११ |
| (२) | थोडें नंतर ... ... | १६ |
| (३) | नायक अपुला ... ... | २३ |
| (४) | नव्या ठिकाणीं ... ... | २९ |
| (५) | नवीन जीवन ... ... | ३५ |
| (६) | चांदण्यांत ... ... | ३९ |
| (७) | विश्वामित्र ... ... | ४५ |
| (८) | मामा आणि बब्या ... ... | ५६ |
| (९) | सूड ... ... | ६५ |
| (१०) | विरह-तरंग ... ... | ६९ |
| (११) | पँच प्रसंग ... ... | ७७ |
| (१२) | सुगंध-वारा ... ... | ८३ |

## थोडें आधीं

### झुळुक १ ली

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. 23/9/914

कोण कोठला कोठें जाईल ?
कोठें राहिल, कोठें खाईल ?
नोकरीचा जो बंदा त्याला
भविष्य कथतां कसलें येइल ? १

पोटासाठीं भटकत जाणें
गांव सोडुनी कैक योजनें;
हें नशिबाला आलें ज्याच्या
कुरकुर त्यानें कांहिं न करणें ! २

सांगेल तिथें गुमान जावें
उलटें, सुलटें नच बोलावें
मान घालुनी खालीं त्यानें
निमुटपणानें काम करावें ! ३

मिळले तेव्हां पगार घ्यावा
नतरी खात्री मोकळी हवा
अधिक उणा नच शब्द बोलतां
करायची पण नेमें सेवा ! ४

'रेडा देतो दूध' म्हणावें
अधिकारी-वच नित झेलावे
मनास मारुन, उसनें हांसुन
लाचारीला सदां वरावें ! ५

स्वत्वाला विसरून असावें
वाऱ्यासह अन् वहात जावें
तोंडदेखलें बोलुन कांहीं
पुढें पुढें सारखें करावें ! ६

—या जगण्याला नांव नोकरी
सराव ज्याला त्यास ती बरी
जाचक असली तरी वाटतें
बेडी वहुतां जणुं सोनेरी ! ७

नायक अपुला नव्हता ऐसा
लक्षि न केवळ रोकड पैसा
स्वाभिमान अन् ध्येयाचा तो
होता खळखळ -निर्झर जैसा ! ८

असता....जर पोटाचा बंदा
केला असता स्वार्थी धंदा
समाज अज्ञानांत पाहुनी
घेई केवळ शिक्षण छंदा ! ९

अन् नायक हो शिक्षक अपुला
विद्यार्थ्यांना प्रेरक झाला
ज्ञान, स्फूर्तिचा पेला भरुनी
शाळा-जगतीं पुरा रंगला ! १०

थोडें आधीं:-

रंगाचा पण भंगच झाला
स्वप्नाचा आणि फुगाच फुटला
कारण ...चालक होते अट्टल
अन् नायक न्यायास मुकेला. ११

" पोरें म्हणजे गुरें काय तीं ?
हाकायाची कुठली नीति
गुरू गुरूंतील भेद नुमजणें
कलीयुगांतिल काय ही मति? १२

पोरें येतीं इथें शिकाया;
तीं कां विद्यालय पूजाया ?
ज्ञानाची जर अटते गंगा;
फी वसुलीचा जोर कासया?" १३

त्वेषांतिल तेजस्वी ज्वाला
चालक-नाड्या करिती गोळा
खादीचें जणुं अवजड पोतें
खुर्चित पडलें लोळागोळा! १४

चालक घामानें थबथबले
मृण्मय मडकें जणुं पाझरलें
दोंद सावरित सरळ होउनी
धापा टाकित सुस्कारले:- १५

" बंद करा ही फाजिल वडबड
चालायाची इथें न गडबड
शहाणपण शिकविता अम्हाला ?
काय समजता आम्हा भेकड? १६

जें जें भकलां...द्या तें लिहुनी
असेल धाडस... द्याच लेखणी
कळेल लौकर निकाल अपुला
देतों लेखन 'वर' धाडोनी " १७

शद्बांशद्बीं उडतां धुरळा
विद्यार्थी हो तेथें गोळा
दटावुनी अन् चालक वदले:-
"चला, घरीं जा! सुटली शाळा" १८

" सुटली शाळा! " हंसुनी भेदक
टरकन फाडी कागद नायक
झरझर लिहुनी जें वदंलेलें
फरकन फेंकी लेखन क्षोभक. १९

अन् वदला " हें धाडा सत्वर
माझ्या देखत...नकोच अवसर
नोंद करा हें नोंद वहींत
अन् लागूं द्या झेंडा वर 'वर' २०

चालक गोरे जाय गोंधळुन
लिहिला कागद टाकी फाडुन
अपुल्या पायावरती धोंडा
घेतल कैसा स्वयेंच पाडुन ? २१

धाक तयाचा वांझा ठरतां
पुनश्च नायक झाला वदता
" वा रे तंबी ! वा रे धाडस !
अध्यांतच कां डाव मोडता? २२

राजीनामा मीच देतसें
नको थांबणें इथें जरासें
नसे फायद्यासाठीं शाळा
चारितार्थाचें साधन कैसें ? २३

नायक अपुला तडक निघाला
विद्यार्थ्यांनीं निरोप दिधला
गहिंवर आला त्या सर्वांना
ओकी ओकी झाली शाळा ! २४

शून्य अशा शाळेस रेलुनी
गोरे पाहे भकास नयनीं
कुणास ठावें त्याचिया मनीं
चालली असे कसली जुळणी. २५

## झुळुक २ री

कोण कुठें चालली नवोढा
हंसगामिनी चाल तियेची
रंग मोतिया पातळांत ती
अवतरली जणुं मूर्ति रतीची १

चैत्रीची का नवी पालवी
कोमलतेचें देई लेणें ?
श्रावणांतली किंवा शोभा
अर्पी तिजला हरिताभरणें ? २

कार्तिकातलें मदिर चांदणें
का देहावर तिच्या नाचतें?
हिमगौरीचा निश्चय नयनीं
यौवन पावित्र्यांत चमकतें ? ३

नीटनेटका वेष तियेचा
एका हातीं पदर सारखा
खाकोटीला मासिक आणिक
दुज्या करी सौगंधी कळिका. ४

रुळे तियेच्या पाठीवरती
नागिण जैसी एकच वेणी
तिला पहातां कुणाकुणाच्या
हृदयाचें हो पाणी पाणी ! ५

षोडष-कुमरी यौवन-पुतळी
नव्हती भंपक स्वैराचारी
दारिद्र्याच्या पंकिं जन्मली
कधीं ना धरी ती लाचारी. ६

पिता तियेचा गेला ' वरती '
विधवा आई तिज सांभाळी
मामाघाचुन नातीं गोतीं
नव्हतीं कोणीं संकटकाळीं ७

तोहि निघाला शकुनी-मामा
कधीं न कामा पडावयाचा;
पोटीं कावा ठेउन कांहीं
पुका कळवळा दावायाचा ८

चरितार्थाचें कुठलें साधन ?
-यंत्रावरती कपडे शिवणें
विधवा उद्योगांत सदां रत
अखंड चालें शिवणें, टिपणें ९

दिवसां मागुन दिवस लोटले
आणि एकदां ये गंडान्तर
दारिद्र्यांतिल कठिण यातना
म्हणजे तापद दुःखाचे शर ! १०

थोडें नंतर

येतां शाळेमधुनी घरला
रस्त्यामध्यें कुणी धटिंगण
पाठलाग करुनिया म्हणाला
'सखये' सजणे देई चुंबन! ११

'हें घे' म्हणुनी कडाडली ती
जणूं अंबरामधली चपला
धटिंगणाच्या तोंडावरती
चपला मागुन मारी चपला १२

बसतां मर्मावरती फटके
तन्नयनांना ये अंधेरी
इतुक्यामाजीं रस्त्यावरती
लोकांची हो गर्दी भारी. १३

सर्दच झालें दृश्य पाहुनी
होई कुमरी क्रुद्धा नागिण
धटिंगणाला बसल्या थपडा
आणि तियेचें हो अभिनंदन १४

पुण्यपुरीच्या दैनिकांतुनी
तिच्या स्तुतीनें भरे रकाना
स्त्री-कैवारी कोणी तिजला
पारितोषिकें देई नाना १५

कन्येचा तो विक्रम पाहुन
मायमाउली धन्य जहाली
' इथें राहणें तापद आतां '
हीच बिला काळजी लागली. १६

गाव तयांनीं झणीं सोडलें
आल्या कात्रज घाटाकडुनी
सातारा जिल्ह्याच्या केली–
सीमेवरती वसती त्यांनीं: १७

शैवागिरीला जीवन सुरुं हो
शिवणें, टिपणें सुरू जहालें.
धंद्याचा जम बसतां तेथें
तिनें मुलीला ध्येय दाविलें. १८

" सुगंधा मुली जा शाळेला
शिक्षण घेउनी हो हो मोठी
भविष्य उज्ज्वल दिसें तुझ मज
सौख्य तेंच गे तुझ्या ललाटीं. १९

या ध्येयानें झाली वेडी
विद्याभ्यासीं होई प्रगति
अकरावीच्या वर्गामध्यें
टाकी पाउल पुढती पुढती. २०

थोडें नंतर:-

नव्हती केवळ विद्याजड ती
ललितकलेची उत्कट आवड
काव्याचा तर छंदच तिजला
वेड तयाचें सुटणें अवघड २१

वाचनालयांतून घरीं ये
अशी नवोढा हंसगामिनी
सुगंध-कलिका हुंगित हुंगित
खाकोटीला मासिक धरुनी. २२

उघड्या माळीवरी घराच्या
चटई टाकुन बसली तीवर
मासिक उघडुन काव्य वाचतां
तिच्या मुखावर दिसली हुरहुर. २३

क्षण वाचावें, नयन मिटावें
काव्यानंदीं चूर असावें
उघडुन नयना वरती बघावें
पुनश्च मासिक अन् उघडावें २४

असें कितिकदां झाल्या नंतर
ओठावरुनी जिव्हा फिरली
मासिकांतली प्रणयी-कविता
निर्भर-मोदें गाऊं लागली. २५

## — तुझें माझें नातें.

निळ्या निळ्या आकाशांत
'लुक लुक' चांदण्याची
किमयाच वाटे सारी
तुझ्या माझ्या प्रणयाची !
श्रावणाची वरसात
जिवा करी कासावीस
तुझ्या माझ्या प्रणयाची
छळीतसे वेडी प्यास !
बगीच्यांत पारिजात
उधळतो पुष्परास
तुझ्या माझ्या प्रणयाचा
बहरला मधुमास !
तुझें माझें नातें राया
असे कल्पनेचा खेळ
तरी तुला चिंतीतें मी
दमयंती जैसी नळ !
राजहंस कोठला मी
तुझ्याकडे पाठवावा ?
आतुरल्या लोचनांनी
किती किती करूं धांवा !

— मुकुंद.

संग्रहालय ठाणे
क्र. ६०६८

नायक अपुला

झुळुक ३ री

ध्येयाचा अन् कर्तव्याचा
असे दांडगा ध्यास जयाला
निर्धाराला कृतिशूराच्या
अनंत काळ व पृथ्वी विपुला. १

ये पाचारण शैवागिरींहुन
दुय्यम कायम शिक्षक म्हणुनी
नायक अपुला होकाराचें
उत्तर सत्वर देइ धाडुनी. २

अन्य नोकऱ्या लठ्ठ पगारी
चालुन आल्या.... उपेक्षिल्या पण
नव्हतें –टेंभू फार दूरवर
विसराया आगरकर-जीवन ! ३

जशा नोकऱ्या तशा मुलीहि
सांगुन आल्या उपेक्षिल्या पण
परिचय, प्रीती संभवल्याविण
रुचे न त्याला विवाह-बंधन ४

त्यांतुन कवि तो गगनविहारी
स्वप्नसृष्टिचा जणुं रहिवासी
वांच्छिल कैसा प्रीतिसुधेविण
रंभा किंवा कुणी उर्वशी ? ५

थोडें नंतरः-

" जणुं माझ्या हृदयाची भाषा
कविनें येथें केली अक्षर
जादुगार तो असेल कैसा ?
ओळखिलें कीं माझें अंतर! ३१

'मुकुन्द' मोहक नांव तयाचें
अन् माझेंहि असें सुगंधा
मनकवडा हा कृष्णच गमतों
होईन का मी त्याची राधा? " ३२

विचार येतां असा मनाशीं
तिच्या जिवाचें रक्तकबूतर
गिरक्यावरती घेई गिरक्या
त्यास ठेंगणें झालें अंबर ! ३३

## नायक अपुला

### झुळुक ३ री

ध्येयाचा अन् कर्तव्याचा
असे दांडगा ध्यास जयाला
निर्धाराला कृतिशूराच्या
अनंत काळ व पृथ्वी विपुला. १

ये पाचारण शैवगिरीहुन
दुय्यम कायम शिक्षक म्हणुनी
नायक अपुला होकाराचें
उत्तर सत्वर देइ धाडुनी. २

अन्य नोकऱ्या लठ्ठ पगारी
चालुन आल्या....उपेक्षिल्या पण
नव्हतें -टैंभू फार दूरवर
विसराया आगरकर-जीवन ! ३

जशा नोकऱ्या तशा मुलीहि
सांगुन आल्या उपेक्षिल्या पण
परिचय, प्रीती संभवल्याविण
रुचे न त्याला विवाह-बंधन ४

त्यांतुन कवि तो गगनविहारी
स्वप्नसृष्टिचा जंणुं रहिवासी
वांच्छिल कैसा प्रीतिसुधेविण
रंभा किंवा कुणी उर्वशी ? ५

थोडें नंतर:-

" जणुं माझ्या हृदयाची भाषा
कविनें येथें केली अक्षर
जादुगार तो असेल कैसा ?
ओळखिलें कीं माझें अंतर! ३१

' मुकुन्द ' मोहक नांव तयाचें
अन् माझेंहि असें सुगंधा
मनकवडा हा कृष्णच गमतों
होईन का मी त्याची राधा? " ३२

विचार येतां असा मनाशीं
तिच्या जिवाचें रक्तकबूतर
गिरक्यावरती घेई गिरक्या
त्यास ठेंगणें झालें अंबर ! ३३

नायक अपुला

झुळुक ३ री

ध्येयाचा अन् कर्तव्याचा
असे दांडगा ध्यास जयाला
निर्धाराला कृतिशूराच्या
अनंत काळ व पृथ्वी विपुला. १

ये पाचारण शैवगिरींहुन
दुय्यम कायम शिक्षक म्हणुनी
नायक अपुला होकाराचें
उत्तर सत्वर देइ धाडुनी. २

अन्य नोकऱ्या लठ्ठ पगारी
चालुन आल्या.... उपेक्षिल्या पण
नव्हतें -टेंभू फार दूरवर
विसराया आगरकर-जीवन ! ३

जशा नोकऱ्या तशा मुलीहि
सांगुन आल्या उपेक्षिल्या पण
परिचय, प्रीती संभवल्याविण
रुचे न त्याला विवाह-बंधन ४

त्यांतुन कवि तो गगनविहारी
स्वप्नसृष्टिचा जणुं रहिवासी
वांच्छिल कैसा प्रीतिसुधेविण
रंभा किंवा कुणी उर्वशी ? ५

होता कवि पण नव्हता फंदी
ध्येयास्तव मार्गे न जोगवा
जें जें होइल, करतां येइल
करी तयाचा पाठपुरावा. ६

निघावयाची करी तयारी
निरोप घ्याया द्याया अथवा
सुन्या घराविण कोण तयाला
कोण रोधि काळाचा कावा ? ७

अर्भक असतां गेली आई
मातृसुखाला तो आचवला
बेचाळिसच्या लढ्यामधें अन्
दुर्दैवानें डाव साधला ! ८

उमर तयाची असेल अठरा
स्वातंत्र्यास्तव होय फरारी
जुलमी सत्ता नष्ट कराया
घेइ झेंप जणुं गरुड-भरारी. ९

शूर वीर तो जवान तगडा
शिवरायाचा मर्द मराठा
खवळुन उठला जसा केसरी
जुलुमशाहिचा जिरवी ताठा. १०

उन्मत्ताना केलें शासन
देशद्रोह्यांचें निर्दाळण–
करतां थरके नोकरशाही
उडे तियेची पुरती गाळण ! ११

आणिक एके दिवशीं आली
पोलिस तुकडी यमदूतासम
घरीं एकटें वडिल तयाचे
पोलिस वदले देऊनिया दमः- १२

" कुठें असे तो तुझा कारटा ?
राजद्रोही, डाकू, कपटी "
म्हाताऱ्याच्या डोक्यावरती
काठीमागुन पडली काठी ! १३

डोक्यांतुन ये रक्त भळभळा
वदे पिता तो तोल सावरून
" तुम्हीच कपटी, देशद्रोही
पाचोळ्यापरी जाल उडून !" १४

कोलमडोनी धरणीवरती
पिता नथाचा पडे पालथा.
पोलिस–तुकडी गेली निघुनी
मृत देहावर मारुन लाथा. १५

नायक अपुला होय पोरका
मायेचें अन् छत्र निमालें
मायेवाचुन काय जगीं या ?
बापुडवाणें जीवन झालें ! १६

लढा संपला...कुणी कुणी पण
देशभक्तिचें पीक काढलें
कुणी थाटुनी दुकान म्हणती
" कार्य न अपुलें अजुन संपलें!" १७

कुणाकुणावर झाले खटले
कुणी सटकले....कुणी अटकले
झाकायाला स्वार्थ, पाप, अन्
खादी कापड स्वस्त जाहलें. १८

नायक अपुला चार पाउलें
लांबच होता गर्तेपासुन
दूर जाउनी पुण्य-पुरीला
बी. ए. पदवी आला घेउन. १९

या घटनांचा आठव येतां
सद्गद झाला कंठ तयाचा
वंदुनि फोटो पिताजिचा, तो-
निरोप घेई सुन्या घराचा ! २०

सातार्‍याहुन सुटली मोटर
उंत्तरेकडे कापित अंतर
शैवगिरीला पोंचायाला
झाली कां तो अितकी आतुर ? २१

नायक अपुला तींत प्रवासी
वळुनी पाहे बाग धनिणिची
विद्यार्थ्यांचें शिक्षण- तीर्थच
कर्मभूमि ती कर्मविरांची. २२

तिथेंच अपुला नायक शिकला
दुय्यम शिक्षण, जीवन शिक्षण
गर्द सांवली वटवृक्षाची
अण्णांचें जणुं वत्सल जीवन ! २३

खडतर सेवा, त्याग, चिकाटी
ह्या त्रिपुटींचा संगम सुंदर
भाउराव जणुं प्रतिक तयांचें
शिवरायाचा पाइक खंबिर. २४

दृष्टिआड हो सृष्टि तेथली
नायक अपुला सरळ बैसला
असेल कसलें स्थान नवें हें ?
विचारांत या गुंगुन गेला. २५

खंडाळ्याची चढण लागली
कुथायाला लागे मोटर
वळणावरती घेउन वळणें
कशी तरी ये ती माथ्यावर. २६

थंडगार वायूच्या स्नेहल
लहरत लहरत आल्या लहरी
पल्लवली कीं नायक मनिंची
काव्यकलामय भाव-वल्लरी. २७

मोटर लागे उतरायाला
नागमोडिमय अवघड उतरण
दरीदरींतिल अवखळ ओढे
साथिस येती गर्जुन गर्जुन ! २८

चौ कोसावर समोर झाडिंत
शैवगिरी तो दिसूं लागला
वळणावरती वळतांना, तो
लुप्त, प्रगट हो क्षणाक्षणाला. २९

झाडींतिल त्या शैवगिरींचा
लपंडाव का असे चालला ?
कल्पनेंत या नायक अपुला
मुकुंद मोरे गुंगच झाला. ३०

## नव्या ठिकाणीं

### झुळुक ४ थी

पश्चिम बाजुस भोर, भाटघर
अन् पूर्वेला नगरी फलटण
दोहोंपासुन मध्यावर हा
शैवगिरी जणुं नव नंदनवन १

खंडाळ्याचा घाट क्षिणीं
उत्तर बाजुस खडा पुरंधर
दोहोंपासुन मध्यावरहा
शैवगिरी जणुं सुरम्य काश्मिर. २

तिर्थे पलिकडे शिव शिखळची
जिथें एकदां चकमक उडली
दूर सालपा जेथें पूर्वीं
मराठ—सेना निकरें लढली. ३

शैवगिरीच्या अंवतीं भंवतीं
हिरवळ येथें, तेथें झाडी
छोटीं खेडीं तींत विखुरलीं
मधेंच कोठें दिसे टेकडी. ४

पूर्व—पश्चिमा नीरा वाहे
शैवगिरी तिष्ठत काठावर
अथांग पाण्यामधें पाहतों
आपुलेंच कीं रूप मनोहर. ५

नीरा नदिच्या घाटावरती
जुनीं देवळें शिल्पकलामय
सकाळ—संध्याकाळीं तेथें
म्हणती भाविक हरहर, जयजय ! ६

स्नानास्तव वा मौजेखातर
हवा खावया अनेक येती
चणे, चुरमुरे खातां खातां
कुणा हेरती....करती जमती ७

चांदरातिला कुणी गुलहौसी
होड्यांमधुनी विहार करती
नितान्त सुंदर, प्रशान्त पात्रीं
कुणाकुणाची जुळली प्रीति! ८

निसर्गरमणिय शैवगिरीच्या
समीप रस्ता दक्षिण-उत्तर
आणि पलिकडे विद्यालय तें
विशाल तैसें नयनमनोहर. ९

समोर मोठें प्रशस्त अंगण
त्यावर चाले खो खो, टेनिस
मासिक कसलें वाचित बसली
सुगंधा किनें एका बाजूस. १०

पुढा पुन्हा अन् दारीं येऊन
वाट पहाती मुख्याध्यापक
वनि वाजतां शाळेंमाजीं
आज यायचे नवीन शिक्षक. ११

ये इतुक्यांतच समोर टांगा
शाळा-चालक पुढें धांवले
नमस्कार करुनी " या " ऐसे
सहर्ष सस्मित प्रेमें वदले. १२

उतरुन आले नवीन शिक्षक
नयन बोलके पन्हाळ कांति
दणकट यष्टी, निधडी छाती
भांग वाकडा डोईवरती. १३

शबनम पिशवी स्कंधिं लटकली
पुस्तक कसलें एका हातीं
मुलें पांगलीं वर्गामाजीं
खाकीधारी बघुनी मूर्ति. १४

हर्षांसांत क्षण बसल्यानंतर
गरम चहाचे आले पेले
चहाबरोबर संभाषणही—
करतां करतां चार वाजले. १५

चाळक दाविति हिंडुन शाळा
अन् शाळेची जवळिल शेती
स्वावलंबनासाठीं जेथें
विद्यार्थी-गण प्रेमें खपती. १६

सभागृहाच्या दाराजवळीं
गारवेलिची फुलें नव्हाळी
आंतच छोटें ग्रंथालय तें
अभिनवता सारीच आगळी. १७

विद्यार्थी-गण, शिक्षक सगळे
जमले तेथें उत्सुकलेले
परिचय करुनी द्याया चाळक
सभेमधें त्या उभे राहिले :- १८

"खुर्चीतिल हे नविन पाहुणे
जिवलग माझे बालपणांतिल
बेचाळिसच्या लढ्यांत यांनीं
सुकार्य केलें अपूर्व उज्ज्वल. १९

लढा संपतां शिक्षण घेउनी
आज घेतला शिक्षक पेशा
शिक्षण-कार्यासाठीं झटुनी
खचितच करतिल उर्जित देशा. २०

अनुक्रम १८२४६ विभाग ८२.०३१.०१ क्रमांक १२४८ दि. २३।१२।५४

सुदैव हें कीं क्रांतीमाजीं
नाहिं जमाविली यानीं माया
नाहिं घेतल्या किंवा जामिनी
भविष्यकाळीं सुखें चराया. २१

नाहिं स्थापिल्या गिरण्या, पेढ्या
नाहिं जाहले दलाल, अडते
मानास्थानासाठिं हपापुन
नाहीं वरिलें नीचपणातें ! २२

नाहीं केला गडबडगुंडा
निवडुन येउन झोंपायाला
निर्मळ सेवक जिवलग माझा
आज मिळाला या शाळेला. २३

प्रज्ञा आणिक प्रतिभा यांचा
संगम मूर्तच हे हृदयंगम
सौंदर्याचे उद्गाते कवि
स्फूर्तीचा जणुं अमोघ उद्गम. २४

ध्येय-पिपासू, आशावादी
कलावन्त आपणां लाभले
मुकुंद मोरे नांव तयांचें ”
बोलुन ऐसे चालक बसले. २५

" मुकुंद मोरे ? मुकुंद कवि हे ?
कविता ज्यांची मज आवडली !
हेच हेच ते ? ज्यांची प्रतिमा
स्वप्नीं माझ्या मी रंगविली ? २६

हेच ते कवी ? ज्यास पहाया–
नयनें माझीं आतुरलेलीं
हेच हेच ते ? कवनें ज्यानीं–
जिवास माझ्या ओढ लाविली ? २७

मुकुंद हे अन् मी तर राधा
अशी गोड मज भूलच पडली
हेच कवी ते ? दमयंतीसम–
मन:कामना ज्यास वाहिली ? " २८

सुगंधा मनीं उठल्या लहरी
स्वप्न मनींचें मूर्त भेटलें
सभा संपली....मुकुंद गेला
भान प्रियेचें पुरें हरपलें ! २९

" पूर्वजन्मिचें सुकृत का हें
योगायोगें सान्निध आलें ? "
या प्रश्नाच्या हुरहूरीनें
तिच्या मनाचें वेड वाढलें ! ३०

## नवीन जीवन

### झुळुक ५ वी

सुरु जहालें नवीन जीवन
कर्तृत्वाला क्षेत्र मिळाले
चालक त्यांतुन मित्र लाभतां
उत्साहाला भरतें आलें. १

उठुनि सकाळीं नेमें लवकर
घाटावरती स्नान करावें
नियम तयाचा असे अबाधित
अपुले कपडे स्वतः धुवावें. २

करुनी कांहीं वाचन नंतर
खानावळिचें कदन्न खावें
पक्वान्नापरि समजुन तेंही
उगीच उसनें ढेकर द्यावें. ३

उशीर नलगे कधीं तयाला.
सर्वांआधीं शाळेमाजीं—
जाउनि, क्षणभर उलटी सुलटी—
करी दैनिकें ताजीं ताजीं. ४

वर्गामाजीं सास्मित जाउन
तन्मयतेनें मुलांस शिकवी
विनोद केव्हां केव्हां कोटी-
करुनी हांसे ... आणि हंसवी. ५

पांडित्याचें करि न प्रदर्शन
कधीं न कोपे नयन वटारुन
प्रसिद्धिची वा छुपी न आशा
करी तयांना वृथा प्रशंसुन ६

दामापुरतें काम करावें
वितभर पोटासाठिं जगावें
मोजिव, मापिव, जोखिव जगणें
ध्येयदृष्टिला कसें रुचावें ? ७

जाउन शाळेच्या शेतावर
काम करी तो मुलांबरोबर
' मळेल कपडा ! चुरेल इस्त्री '
कधिं न मनीं ये असा विचार! ८

कुणा म्हणे " हीं वाच पुस्तकें "
करि सर्वांच्या शंका निरसन
कुणा म्हणे " गा, करा सावर्णे
लिहा लेख वा " दे उत्तेजन. ९

" पोपटपंची नको आंधळी
निसत्वही करुं नका हमाली !
उघडुन डोळे स्तवा शारदा
भवितव्याची तीच साउली " १०

उत्साहाचे सुटतां वारे
विद्यालय चैतन्यें भरलें
सुगंधा मनीं नव आशांचें
नाजुक नर्तन सुरू जाहलें ११

"परिचय लौकर कैसा व्हावा?"
ओढ लागतां जिवाला अशी
पुस्तक घेउन जाय सुगंधा
मुकुंदाचिया खोलीपाशीं. १२.

सायंकाळीं चुळबुळलेली
सुगंधा कीबे दारीं दिसतां
"ये ना! शंका काय उद्भवे?"
मुकुंद झाला ऐसें पुसता. १३

आंत जाउनी वदे सुगंधा
"द्या ही कविता समजावोनी,
जूलियनांची सुंदरतमही—
वेंच्यांतिल 'तेथें चल राणी'!" १४

गानकला अर्थांत विहरली
भावकला ये उचंबळोनी
रसिक सुगंधा मनांत बोले
"चला राजसा! मी तर राणी!" १५

दिसे तिथें तुकयाची गाथा
कुसुमाग्रज अन् जूलियनांचा-
काव्यकलाधी आणिक ' वर्षा '-
शां. ज. शेळके कवयित्रींचा. १६

घेउन ' वर्षा ' सुगंधा वदे-
" नेउं काव्य हें वाचायाला? "
" वाच आणि कर असलीं काव्यें. "
लव हांसुन तो तिज उत्तरला. १७

तींहि म्हणाली " वाचियलें मी
तें ' निळ्या निळ्या आकाशांत '
छानच करतां कविता तुम्ही!
वाचक बुडतो आनंदांत! " १८

मुकुंद बोले, " वाचक बुडतां?
कशास वाचा, बुडवी कविता? "
विनोदे उत्तर श्रवतां तिचि हो-
पुरेवाट हांसतां हासतां ! १९

हांसत, हासत जाय सुगंधा
वेगें जैसी विजली चमकत
मुकुंद मानस क्षणभर झालें
आगमनानें तिच्या प्रकाशित! २०

झुळुक ६ वी

दिवसांमागुन दिवस चालले
    ये कंटाळा यांत्रिकतेचा
सायंकाळीं घाटावरती
    कधीं कधीं तो असावयाचा. १

शीण दिनाचा घालवावया
    हवा मोकळी इथली सुंदर
मन रमवाया, मन शमवाया
    निसर्ग येथिल रम्य मनोहर. २

अगाध पात्राकडे पाहुनी
    गूढ विचारीं गुंगायाचा
विशाल गगनीं अचल लोचनीं
    अमूर्त कांहीं शोधायाचा. ३

कधिं माशांना टाकुन शेंगा
    'फडफड' गंमत बघावयाचा
कधिं पायाचा ठेका धरुनी
    गुणगुण गाणें म्हणावयाचा. ४

असा एकदां तल्लिन असतां
    सुगंधा किवे जवळी येउन
आग्रह करुनी आगत्यानें
    जेवायाचें देओ निमंत्रण. ५

"मम मातेची फार अपेक्षा
आपण अमुच्या सदनीं यावें"
रुकार देई...नकार द्याया
मानस त्याचें कसें धजावें? ६

"चला, चला तर" वदे सुगंधा
मुकुंद जाई तिच्या बरोबर
सहर्ष स्वागत करि वेणाई
म्हणे 'बसावें या पाटावर'. ७

हाडांचीं जरि झालीं काडें
बळकट निश्चय दिसे लोचनीं
दृग्गोचर हो वत्सलता अन्
तुळशीचें पावित्र्य आननीं ८

साधे रुचकर पदार्थ वाढित
म्हणे सारखी "घ्या घ्या थोडें"
कुशल विचारी आणिक सांगे–
इकडिल तिकडिल मोठ्या कोडें ९

मुकुंद–गत–जीवन श्रवतांना
वेणाईला आला गहिंवर
तोंहि हळहळे वेणाईचें–
ऐकुन जीवन खडतर, दुस्तर १०

भोजन सरतां वदे माउली
“ शिवणयंत्र हें जीवनसाधन.
थकलीं गात्रें...कसें श्रमावें
कैसें व्हावें मुलिचें शिक्षण. ११

खपता तुम्ही अभ्यासास्तव
लक्ष असूं द्या असेंच पुढती ”
मुकुंद वदला ‘ नको काळजी
शिष्यवृत्ति अन् मिळविल कीर्ति.’ १२

वेणाईचा जीव हरकला
आणि सुगंधा होये प्रफुल्लित
चांदण्यांतल्या सहलीसाठीं
मुकुंद उठला निरोप घेत. १३

त्याजबरोबर निघे सुगंधा
निःसंकोचें माय पाठवी
ईप्सित मनिंचें संनिध येतां
सुगंधा कळी का न खुलावी? १४

जरि खुललेली...चालत असतां
मनिंची आशा मनांत लपवुन
उगीच वरवर कांहिं विचारित
तन्मनवृत्ती निरखी हांसुन. १५

चतुर स्रीमती अचुक जाणते
    परपुरुषाच्या अंदाजाला
निर्विकार तिज मुकुंद दिसला
    अबोल झाली....कोणी आला. १६

तो तर शाळेंतिल विद्यार्थी
    घेउनि जाई यांना सत्वर
विद्यार्थी थांबले जिथें ज्या
    नीरा सरितेच्या घाटावर १७

स्थान अगोदर निसर्ग सुंदर
    त्यांतुन पडलें टिपुर चांदणें
सुधाधवल दर्यांत विहरतां
    उसळुन ये वर हंसणें, गाणें. १८

विनोद, थट्टा....गप्पा गोष्टी
    सरबत्तीला आली भरती.
पीत जणूं चंद्राचें पीयुष
    सुगंधा किबे पाहे वरती १९

हळुंच बोलले तोंवर कोणी
    " गाच सुगंधा सुंदर गाणें. "
मानावरती येउन सुरती
    वळवी खालीं कमल लोचनें २०

विकासित दिसलीं कमल-लोचनें
 — यास चंद्रका कारण कोणी?
आग्रह होतां गाई गाणें —
 भावोर्मींनी भारावोनी. २१

तें ‘ निळ्या निळ्या आकाशांत ’
 स्वरकिन्नरिसम म्हणतां गाणें
प्रगट होइ तंव काव्य आणखी
 काव्यसुंदरी तिच्या रुपानें ! २२

ज्योत्स्नामय कीं भाव-लकेरी
 स्मित ओठींचे तरल खुमारी
हृदीं उठवि ती नाजुक लहरी
 सुगंधा गमे स्वप्न—शर्वरी ! २३

मुकुंद लागे डुलावयाला
 सुगंधा वदे “ घाटच हा ‘ सर ’
डुलावयाला संत तुकासम
 नोहे हा भंडारा-डोंगर !” २४

हास्याचे उडवीत फवारे
 सर्व निघाले घरीं जावया
वाटा फुटती...मुकुंद मोरे
 जाई तिजला पोंचवावया. २५

वळणावरती म्हणे तिला तो
" गाइलेस तूं छानच गाणें "
" छानच गाणें! अन् मम गायन ?"
पुसे सुगंधा विश्लेषानें ! २६

मार्मिकता पाहुनी तियेची
" छानच गायन " तो उत्तरला
तीहि म्हणाली " खरेंच ! अगदीं ?
द्या तर बक्षिस कांहीं मजला !" २७

पुन्हां बोलला " योग कसा बघ
बक्षिस आधिच उपटलेंस ना! "
" वर्षा " वरचा रोख जाणुनी
तिच्या मुखाचा हंसे आयना ! २८

चंदेरी वृष्टींत न्हाउनी
दाराजवळी येतां तिचिया
चंदेरी दृष्टींत पोहुनी
खोलिकडे तो वळे निघाया. २९

तों ती बोले हळूंच " थांबा "
पुष्पें तोडुन त्यासीं देतां—
हात लडबडे त्याच्या हातीं
तोहि गडबडे जातां जातां !! ३०

झुळुक ७ वी

मुकुंद अध्यापन कौशल्यें
शाळा–जगतीं प्रियतम झाला
कार्यामध्यें जीव ओततां
मिळे मान्यता कृतिवीराला. १

खेड्यापाड्यांतील मुलें जीं
ज्ञान घ्यावया येतीं इकडे
करतीं तीं तर गुरुमहिम्याचा
बोलाबाला जिकडे तिकडे. २

सायंकाळीं सुटतां शाळा
जाइ रोज तो दूर फिराया
पांडवदरिच्या टेकडीवरी
बसुनी पाहे संध्या–माया. ३

या संध्येच्या मायेमाजीं
दृग्गोचर हो त्यास ‘ सुगंधा ’
चांद-रातिचा प्रसंग स्मरतां-
उचंबळें मन आणि हो द्विधा ! ४

सरस्वतीच्या पवित्र मंदिरिं
चंचलतेला पाप मानि तो
परंतु अनुग्रह तिचाच पाहुनि
गोंधळलेला जिव तडफडतो ! ५

" वेणाईच्या विश्वासाचा
 घात करावा होउन चंचल ?
वेणाईच्या कन्याध्येयीं
 विघ्न आणुं मी स्वार्थें पागल ? ६

ब्राह्मण ती अन् मीहि मराठा
 खपेल का हें वेणाईला ?
ओरडेल जग! .... कसा लावुं मी
 डाग शिक्षकी पावित्र्याला? ७

परस्परांचें हें आकर्षण
 दोषी कोणा कुणी म्हणावें?
तिचेंच पाउल पडतां पुढती
 अपराधी मज मीच गणावें? ८

असेल का पण पाउल खंबिर
 विवेक कुठला आसक्तीला
असेल जर ही अजाण प्रीति
 जाणिव द्यावी का न तियेला?" ९

मंथन चालें मनांत त्याच्या
 विचार—रत्नें लागत हातीं
उलटे सुलटे वारे सुटतां
 मनःसागरीं पुनश्च बुडतीं.! १०

प्रीतीची तर तऱ्हा आगळी
चंचलतेची जणूं चंचला
उच्छृंखल पण नसे सुगंधा
मोहक पण ती मुग्धा बाला ११

मुग्धा तैशी मूर्ती शालिन
चंचलतेचें उठवी वादळ
हुशार जितकी तितकी लोभस
वेड लावितें नयनींचें जळ. १२

गृहपाठाच्या वह्यांमधून
गृहपाठासह गुलाब-कलिका-
सदैव येतां मुकुंदाकडे
अखेर बनली एक मालिका! १३

"काय करावें? काय करावें?
विश्वामित्रासम होऊं का?
ध्येयदृष्टिला स्वप्न म्हणोनी
वरूं सुगंधा मुग्ध मेनका. १४

ध्येयाचा जंव आठव येतां
प्रणयि-खगाचे पंखच तुटती
कर्तव्याचे मार्ग तयाला
कर्तव्याच्या जगतीं नेती. १५

शिकवायाचा भाग संपतां
करवुन घेई सर्व तयारी
कसोशिनें अन् कसोटिचे तो
निवडक मार्मिक प्रश्न विचारी. १६

कृतज्ञतेनें मुलें बोलतीं
" अमुच्या गावीं चलाच गुरुजी"
आपुलकीचा भाव जाणुनी
आग्रह शब्दें होई राजी. १७

सुगंधास तर नित्य म्हणे तो
" येई निश्चयें पंहिल्या श्रेणींत "
आज परी हे शब्द तियेला
विरक्ततेचे होते भासत. १८

दिन सुट्टीचे व्यर्थ न दवडी
खेडोपाडीं मुलांबरोबर
दुचाकीवरी बसुनी जाई
जनता म्हणजे त्याचा ईश्वर. १९

ईश्वर दैन्यामधें गांजला
जरि तो धरतो हातीं नांगर
माणिक, मोतीं कितिही पिकुं द्या
खेडें दरिद्र्याचें आगर! २०

निराधार अन् उपासपोटीं
खड्ड्यामधला ईश्वर दिसतो
लज्जारक्षण करण्यापुरतें
वस्त्र मिळेना ईश्वर रडतो ! २१

अज्ञानाच्या अंधाराचे
जालिम पडदे फाडायाला
या ईशाच्या गोपाळांतुन
हवीत रत्नें वेंचायाला. २२

यास्तव झाला मुकुंद शिक्षक
ज्ञानाचा तो होय पुजारी
या ज्ञानाच्या किरणशरांनीं
छेदायाचे प्रमादी अरी. २३

अन्यायाचें करित प्रदर्शन
उपाय कांहीं त्यावर सुचवित
मुकुंद मोरे अज्ञ बन्धुना
करीत होता सदांच जागृत. २४

शद्बबंब पण नव्हता मोरे
व्याख्यानाचा उरुस कराया
मर्म जाणुनी कर्म करी तो
पोपटपंची सोस कासया ? २५

शिवागिरीच्या अवतीं भंवतीं
पंचक्रोशिंत असा फिरे तो
निसर्ग-रमणिय दृश्यें पाहत –
असतां, त्यांतच गुंगुन जातो. २६

छंद तयाचा जाणुन ऐसा
सहजच त्याला पुसलें कोणी :-
" पहा देउळें ' सत्यसतीं ' चीं
अजत्र तयांची प्रेमकहाणी " २७

--कथा ऐकुनी सर्व सविस्तर
चुटपुट लागे मना त्याचिया
कविमन त्याचें धांवें तिकडे
' सत्य-सती ' चें स्थान पहाया. २८

पांडवदरिच्या पश्चिम बाजुस
नदी सुरंगा वाहे जेथुन
दोन तिरावर दोन देवळें
दरींत तेथें दिसतीं शोभुन. २९

प्रीतीसाठीं गारद झाला
त्या ' सत्या ' चें देउळ इकडे
प्रीतीसाठी जीव दिला त्या
दिव्य 'सती' चें देउळ तिकडे. ३०

मधुन खळाळे नदी सुरंगा
जणुं गाई ती प्रेमकहाणी
गत गोष्टींना साक्ष असे ती
कविला बोले खळखळ-पाणी. ३१

“ ये कविराया! ये कविराया!
कथितों तुजला शोककहाणी
दोन जिवांचें क्रंदन लिहुनी
अमर करी रे तुझी लेखणी. ३२

सत्याजी अन् सति हे दोघे
सवंगडी जणुं बालपणींचे
अशाच एका घटनायोगें
जुळलें नातें परस्परांचें ३३

धुणें धुवाया गेली असतां
यवन नदीवर गाठी तिजला
सत्याजीनें धावत येउन
इथें यवन तो ठारच केला. ३४

जयें राखिली लाज सुदैवें
त्यास मानि ती सखा जिवाचा
सत्याजीला स्वर्ग गवसला
ठेवा जणुं ती त्यास सुखाचा. ३५

पिता सतीचा उपकारास्तव
    देइ त्याजला कांचनीकडे
कसें कळावें पित्यास? सतिचा—
    सत्याजीवर जीव अति जडे. ३६

सत्याचा लागतां सुगावा
    पिता करी लग्नाची घाइ
' वर शोधाया जातो ' ऐसें—
    लटकें बोलुन लपुनी राही. ३७

संधी साधुन ही सुटकेची
    पळुन निघाली सती नदिकडे
पहात होता वाट तियेची
    सत्याजी तो नदीपालिकडे. ३८

खूण तियेची पटतां त्याला
    नाव घेउनी निघे पलिकडे
— तिच्या पित्याचे पाळतवाले
    चालुन येती त्याचियाकडे. ३९

सत्याजीच्या डोक्यावरती
    तलवारींची पडली पातीं
रक्ताच्या चिळकांड्यासंगें
    'सती! जिवलगे!' हाक निघे ती. ४०

पाण्यामध्यें मुडदा पडला
दृश्य पाहुनी भीषण भेसुर
‘ मीहि जिवलगा आल्यें ’ म्हणुनी
झेंप घेइ ती पात्रीं सत्वर. ४१

भेट तयांची माझ्या उदरीं
हृदयीं माझ्या त्यांना शांति
प्रीत-स्मारकें बघ कविराया
दोन्हीं बाजुस तीरावर तीं.” ४२

सत्यसतीची बघुन मंदिरें
मुकुंद मोरे सद्गद झाला
प्रशान्त तेथिल छायेखालीं
स्फूर्तीचा तर उसळे पेला. ४३

स्फूर्तीच्या गुंगींत विहरतां
येइ दिनांतीं शैवगिरीला
त्या रातींतच काव्य लिहुनिया
दिलें मासिकीं छापायाला. ४४

उठुनि सकाळीं बरेच उशिरा
जाई स्नानास्तव घाटावर
पाठिं न भुंगा आजिं शाळेचा
झाली होती वर्ष-अखेर. ४५

पात्रामध्यें नवलच दिसलें
बंद हवायुत 'इनरी' वरता
नवथर कोमल देह सावरुन
जळीं सुगंधा पोहत होती. ४६

अंगिं चिकटल्या वस्त्रामधुनी
यौवनतेची दिसे कमलिनी
आर्द्र नव्हाळी बघुन तियेची
सुगंधा गमें मत्स्यगंधिनी ! ४७

अजब तियेची साहसयुक्ति
लीलेनें पोहतां अचानक
बळेच सोडुन हवा....आरेडे
'धांवा! बुडले! व्हा उद्धारक!' ४८

सप् सप् पाणी कापित जाउनि
मुकुंद घेई तिला पाठिशीं
भुजांत आणुन सर्व शक्तिला
बहुत प्रयासें ये कांठाशीं ४९

नशिब शिकंदर! त्या वेळेला
नव्हते कोणी घाटावरती
जर का असतें कुणी पाहिलें
पुरीच झाली असती फाजिती ५०

विश्वामित्र

कृतज्ञतेने लटक्या, बाला—
म्हणे " वांचलें तुम्हामुळें मी!
उतराई मी होऊं कैसी ?
या दीनेचे तुम्हि व्हा स्वामी!"

विश्वामित्रापरी मुकुंदा
स्वीय लाघवें झणिं विरघळला
लटके बोलुन वरवर कांहीं
' छे! छे!' ऐसें मधु चाचरला! ५२

अनुक्रम १.५२.२.८
विभाग २७:३१०
क्रमांक १२५६
नों. दि. २३।१।७१
वाचनालय शाखा

## झुळुक ८ वी

नकारांतल्या ‘ छे! छे! ’ मधुनी
‘ हो! हो! ’ आशय दिसे तियेला
असाच असतो बहुधा रमाणिय
अर्थ प्रीतिच्या कोशामधला. १

हितगुज चालें चंद्रासंगें
निश्चल नेत्रीं पाही वरती.
सुधाकरांनीं नाहत असतां
रोमांचित ती होई सुदती. २

आधिच होतें वेड फुलांचें
त्यांतुन ती तर पुष्पकोमला
प्रीतिपुष्प लागतां फुलाया
फुलांफुलांतुन सुगंध सुटला ! ३

प्रसंग घडला तिज आठवतां
चमकुन जाई देहीं चपला
चिंतन करतां भावि सुखांचें
सरकन महिना निघुनी गेला. ४

येइ परीक्षा–निकाल जवळीं
होती खात्री प्राविण्याची
लक्ष न तिकडे, लक्षित होती–
प्रीत-परीक्षा कधीं व्हायची ? ५

यंत्रावरती शिवण करी ती
चुकती टाके...तुटतो दोरा
येणाईला कसें कळावें
कन्दा चिंतित होति चकोरा. ६

भोळी माता! तिला वाटलें--
असेल चिंतिच वर्गच पहिला
मुग्ध मनांतील लपली सृष्टी --
कशी कळावी ती अन्याला. ७

ये इतक्यांतच टपालवाला
टाकुन गेला मासिक 'ललिता'
आधिरपणानें उघडुन पाहे
मुकुंद कविंची सुंदर कविता. ८

'सत्य-सती' हें नांव तियेचें
परिचित होती तिला कहाणी
त्यांतुन मुकुंद कविची भाषा–
वाचायाची तिला शिराणी ९

सत्य-सतीचें द्वंद्व-गीत तें
दोन मृतांचें शोकरसायन
-- तयांत करते सुगंधा किबे
तन्मयतेनें जणुं अवगाहन. १०

## सत्य-सती

सती:– जिवाच्या दिलवरा माझ्या!
तुला कोठें पहायाचें?
घडींचे सोबती मी तूं
पुन्हां नातें सरायचें!

सत्याजी:– हिमानी पांखरा माझ्या
कळी तूं कोवळी नामी
इमानी प्रीतिचे धागे
सखे आतां तुटायाचे!

सती:– जयानें घात हा केला
तयाला लाभले कांहीं
जयानें रक्षिली लज्जा
तयाला का चिरायाचे?

सत्याजी: न अंगीं त्राण बोलाया
यमाचे पाश गे आले
जहाल्या गोष्टिची चर्चा–
करोनी प्राण का वाचे?

सती:– यमाचे पाश तोडी ती
सती सावित्रिची निष्ठा
न ती थोरीव या जीवा
परन्तु मी झटायाचे!

सत्याजी:- नको तूं साहसी होवूं
नको तूं प्राण वा देवूं
तुझ्या मी जीवनीं विर्ती
तुला सौभाग्य सौख्याचें!

सती:-- नको सौभाग्य तें राया
तुझ्याविना असे वाया
तुला पाण्यांत लोटीलें
कशाला मी जगायाचें?

सख्या आल्येंच भेटाया
उडी ही घेतली पात्रीं
कळूं दे त्या विरोधाला
चिरायू बंध प्रीतीचे!

— मुकुंद.

शोकविदारक करुण काव्य हें
तिच्या जिवाला चटका लावी
जातिवंत ती प्रीत बघोनी
तिच्या प्रीतिला फुटे पालवी! १९

मिटलें मासिक....मिटले डोळे
चिंता लागे भवितव्याची
" होइल का मम सफल मनोरथ "
अवघड भारी वाट प्रीतिची! २०

येइ अचानक मुकुंद तेथें
तार घेउनी तिच्या यशाची
कृतार्थता आणून लोचनीं
सांगे वार्ता आनंदाची! २१

" वेणाई ! ही आली पाहिली
बहुत बाक्षिसें हिनें मिळविलीं
शिष्यवृत्तिवर शिकेल पुढती
चिंता तुमची अमुची सरली." २२

" या सुयशाचें श्रेय तुम्हाला
असाच अक्षय लोभ असूं द्या.
वैद्यक शिक्षण शिकावयाला
पुण्यपुरीला ही जाउं द्या !" २३

वेणाईनें वदतां ऐसें
" अवश्य धाडा " मुकुंद बोले
येइ सुगंधा घेउनि हातीं
गरम चहाचे नक्षी पेले. २४

आज चहाला अवीट गोडी
सगळे होतें आनंदांत
गोरे मामा तेथ प्रगटले
खडा मिठाचा पडे दुधांत ! २५

मामा आणि बब्या
गोरे, मोरे परस्परावर
फेकित होते दृष्टिचे शर
मायलेकिंना कसें कळावें
अहिनकुलांचें भांडण कटुतर! २६

मुकुंद जातां, त्या दोघींना
आश्चर्याचा बसे हादरा
गोरे मामा, बब्या तयांचा
मुखडा करती कृतक हांसरा. २७

" बब्या आमचा झाला बी. ए.
सुगंधाहि हो मॅट्रिक यंदा.
अनुरूप दोघे परस्परांना
उडवुन टाकू बार एकदां! " २८

भावाचा तो मतलब पाहुन
वेणाई उत्तरली सत्वर
" नका विचारू मला, सुगंधा—
देइल याचें अंतिम उत्तर. " २९

वदे सुगंधा तुटकपणानें
भव्य कपाळीं आठी आणुन
" क्षमस्व! नाहीं मुळींच मानस;
शिकायचें मज पुढती शिक्षण!" ३०

नकार येतां....विषय बदलुनी
वदले मामा " मुकुंद उर्मट!
आम्ही अमुच्या शाळेमधुनी
हकलुनी दिले...कारण उद्धट!" ३१

" विपरित भाषा कशी बोलतां?
जैशी दृष्टी....तैशी सृष्टी! "
उसळुन ऐसें वदे सुगंधा
मनीं होउनी फारच कष्टी. ३२

" वाटायाचा तुला साव तो
अंध दृष्टिला अंधच सृष्टी! "
मामानें टोमगा मारला
– दाटे संशय धरला पोटीं ३३

फणकाऱ्यानें वदे सुगंधा
" डोळस दृष्टी दिव्य आपुली–
असूंघाच लखलाभ तुम्हाला
नको तियेची मला बहाली! " ३४

विस्फारोनी डोळे मोठे
अद्दातद्दा मामा बोळे
भवितव्याचा निश्चय करुनी
बऱ्यास ठेवुन निघुनी गेले. ३५

दिव्य पित्याचा दिव्य तनय तो
        खाण तशी मातीही असते!
ओठ बाबरे, नाक फेंदरें
        गोरीलासम धूड दिसे तें! ३६

जसा नाचुनी घुमे पारवा
        तसा म्हणे तो बाष्कळ गाणीं
विचित्र लीला बघुनि बव्याच्या
        लागे वेणाईस घोरणी. ३७

सुगंधा सदां सावध होती
        ओळखिते स्त्री पापी नजरा
जागृत राही....कारण कीं तो
        अस्तनीतला लाल निखारा. ३८

देवदर्शनास्तव वेणाई
        एके दिवशीं बाहिर जातां
मुकुंद राहे पाळतीवरी
        किवेचाच हा बनाव होता. ३९

बव्यास वाटें संधी आली
        मर्यादेचें हो उल्लंघन
लगट करोनी म्हणे तिला तो—
        'दे मज कडकडुनी आलिंगन!' ४०

" या ना सखया! " म्हणुनी ऐसें
दिली तियेनें त्याला थप्पड!
मुकुंद येई तेथ सत्वरीं
आणि बब्याची थांबे घडपड ४१

मुकुंद क्रोधें बनला इंगळ
लाथ बब्याच्या पृष्टीं बैसली
कोलमडोनी पडतां खालीं
वेणाई तों तेथें आली! ४२

खरकन् उतरें तोंड बब्याचें
मार खाउनी गांवीं गेला
सुगंधास अन् वेणाईला
अति उपकारी मुकुंद झाला ४३

वैद्यक विद्यालयीं पुण्याला
जाय सुगंधा घ्याया शिक्षण
माय, सख्याला सोडुन जातां
विरह-विचारें भरले लोचन. ४४

सत्यसतीची स्मरुन कहाणी
हो तिचिया हृदयाचें पाणी
"होइल का मम सफल मनोरथ?"
जिवास लागे अशी बोचणी! ४५

झुळुक ९ वी

नव्हते मामा लेचेपेचे
अधिकाऱ्यांशीं सूत तयांचें
खोटें झणिं जमवून पुरावे
उट्टे काढित अपमानाचें. १

मुकुंद आणिक सुगंधामधें
दिसे तयाला सूत 'निराळे'
जाय सुगंधा दूर हातची
जीव तयाचा म्हणुन जळफळे. २

तों ये वार्ता दुसरी घडली
तीस तिखट अन् मीठ लागलें
कोपे मामा जमदग्नी सम
खाणतेल जणुं अग्नित पडलें. ३

बऱ्यास पाहुन हिरमुसलेला
मामाचें काळजि चरकलें
" मुकुंद मोरे! घडा भरे तव
क्रोधाग्नीनें फार भडकलें. ४

शिक्षणखात्याकडे तयानें
दिला पाठवुन अर्ज सविस्तर
आशय त्यांतिल विचित्र होता
खोटानाटा तसा भयंकर! ५

"मुकुंद मोरे शिक्षक लंपट
वर्ग-मुलींशीं करतो चाळे!
करी चळवळी शाळा सोडुनि
अभ्यासाचें निघें दिवाळें?" ६

होय चौकशी आरोपांची
लंपट कैसा? नसे पुरावा
निकाल शाळेचा तर उज्ज्वल
आरोप हाहि कसा ठरावा? ७

चळवळ येथें कुठली केली?
"चिथावणि तुम्हि लोकां देता"
जमिनदार कुणि साक्ष देतसे
मुकुंद आणे कावा पुरता. ८

चोर यंत्रणा असतां देशीं
चोरच होतो मोर बिलंदर
सरळमार्गी तर मिळतो धुळिला
न्याय तयाचा बने कलंदर ९

" अंध जनांना डोळस करणें
जागिव सत्वाची वाढविणें
सुशिक्षितांचा धर्म असे हा "
मुकुंद बोले स्वाभीमानें १०

– आणि तयाची जाय नोकरी
नव्हता वाग्भट जरि पक्षाचा
निरोप देई बहु दुःखानें
मुख्याध्यापक मित्र तयाचा! ११

विद्यार्थी–गण जन भंवतींचे
अर्ज तसेहि करिती तारा
' हवे अम्हांला मुकुंद शिक्षक '
अधिकारी पण नमे नच जरा १२

मुकुंद नाहीं लव डगमगला
नाहीं केलें लांगुल चालन
पोटाचा जो गुलाम नसता
बसेल कैसा घुंघट घालुन? १३

वेणाईला वृत्त समजतां
तिच्या जिवाला धक्का बसला
बोलवुनी आणतां तयाला
कारुण्याचा बांधच फुटला! १४

" जगीं त्रास का सौजन्याला?
काय आपुला गुन्हा जाहला ?
निष्ठुर दैवा कां छळतोसी?
अनंत दुःखें देशि भल्याला! " १५

माउलिला त्या मुकुंद बोले
"सत्त्वाची ही असे परीक्षा
जाय नोकरी....जावूं दे ती
सोडणार मी नाहीं दीक्षा!" १६

आरोपांचें होय निवेदन
गोरे मोरे-तंटा कथिला
भावाची ही करणी पाहुन
खेद वाटला वेणाईला. १७

आणि लिही ती पत्र मुलीला
आरोपांचें सार कळविलें
सूचक मजकुर लिहुनी कांहीं
प्रत्युत्तर कीं झणिं मागविलें. १८

अन्यायाला द्याया ठोकर
मोऱ्यानीं फिर्याद ठोकली
बदनामीच्या शल्यें; त्याच्या
होय जिवाची तस काहिली. १९

मुख्याध्यापक मित्र तयाचा
मित्रास्तव साह्यास धांवला
धन्यच तो संकटीं म्हणे जो-
जीवेंभावें सखा "आपुला." २०

## झुळुक १० वी

पत्र आइचें वाचायास्तव
सुगंधा किंव फाडि लिफाफा
आपय आंतिल वाचुन बघतां
हृदय तियेचें करी धपापा! १

वेणाईनें लिहिलें होतें
" पोरी! मजला येते शंका
मुकुंदावरी आषक का तूं? —
वा उठलेली वार्ता भुमका? २

आहे जरि विश्वास तुझ्यावर
माया करते मजला व्याकुळ
मनांत येतें भलतें सलतें
आवर पोरी! चुकतें पाउल! ३

मुकुंदरावावरती आला
दुर्दैवाचा निर्दय घाला
निरसन कैसी करुं आशंका
कठिण समयिं का पुसूं त्याजला? ४

घोर जिवाला मुली लागला
सत्वर धाडुन देई उत्तर
तोंवर माझे प्राण लटकले—
चिंतेच्या गे जणूं सुळावर!" ५

त्रिशंकूपरी होय सुगंधा
मनांत काहुर-वादळ सुटले
आणि तटातट प्रीतकळ्यांचे
तळापासुनी देंठच तुटले. ६

सत्प्रीतीचा पंथच खडतर
कधीं न वाहे संथ सरळसा
आणि तियेचा जीव तडफडे
जळावीण कीं जैसा मासा. ७

काकुळतेनें लिही सुगंधा
" अजुनी पाउल चुकलें नाहीं!
मुकुंदाविना अशक्य जगणें
तार, मार वा करें कांहींही! " ८

मुकुंद मोरे, सुगंधा किवे
कळवित होते परस्परांना;
ताटातुटिनें उद्भवलेली
पत्रोपत्रीं विरह-भावना. ९

ताटातुटिनें अबोल प्रीति
आज वाच्य हो अक्षरांतुनी
मुग्ध सुगंधा व्यक्त करी कीं
तिच्या जिवा लागली लागणी! १०

सुगंधा :-

लागलेलें वेड जीवा ज्ञात तुम्हां अन् मला
स्वप्न माझें सत्य व्हावें ध्यास राया लागला
भावनांची एक भाषा आपुल्या चाले हृदीं
दोन फाटे हे तियेला कां फुटावें आजला ?

प्रीत मी केली अबोली वृत्ति माझी लाजरी
लाजरीच्या रोपटीला लागल्या नाना कळा
चंद्र तुम्हां मानिलें मी अन् मला मी चांदणी
चांदणें लोपून जातां दाटुनी येतो गळा !

प्राण तुम्ही या जिवाचे राहतां कैसें दुरी
अंतरींचा भंगितां का प्रेमपूजा–सोहळा ?
कृष्ण तुम्ही राधिका मी हें न नातें वांच्छितें
इच्छितें मी रुक्मिणीची भूमिका, भक्ती लळा !

हाय! झालें दैव खोटें! थोर बाणा आपुला
कोपला शत्रू; तयानें तीर तुम्हा मारिला
विद्ध झालें मी परी हो....नीर माझ्या लोचनीं
ओढणी लागे जिवाला धीरही अन् लोपला !

माउलीला येइ शंका तीस नातें नावडें
आवडावें तें कसें हो नीच स्वार्थी मातुला ?
रोधिलें त्यांनीं कितीही प्रीत माझी निश्चल
आपुल्या पायींच प्रीती वाहतें मी विठ्ठला !

मुकुंद :--

ओढ लावीशीं जिवा तूं प्रेमवेडी बालिका
प्रेम तुझें व्यक्त होतां हांसली गे चंद्रिका!
स्वर्गसौख्याचाच ठेवा तूं जरी सौदामिनी
वंचुनी आईस तुझ्या होउं कैसा मी सखा ?

ठेविला विश्वास तीनें घात त्याचा का करूं ?
विस्मरूं का नीत माझी बेइमानी होउं का ?
संगमासाठीं सखे मी सिद्ध झालों गे जरी
शर्वरी! मी माउलीला होउं कैसा पारखा ?

मी मराठा ब्राह्मणी तूं भिन्नता जातींतली
माउलीला शल्य हें कीं प्रीत अन् वाटें फुका !
कोण भावाचा भुकेला अंधरूढीच्या जगीं
वाउगी ही त्याज्य प्रीती जेथ ऐसी भूमिका !

वाट कांटेरी असे हीं प्रीतिची गे साजणी
चालुनी होशील कष्टी पायिं तापे वालुका
विव्हाला तूं गे शुभांगी जोड माझी वांच्छिसी
उर्वशी ! तुझ्याविना गे नान्य नेत्रीं कन्यका !

मुग्ध नातें व्यक्त केलें दोन काव्यीं छानसें
गे पिसें लागे चकोरा उज्ज्वला तूं तारका
स्वप्न माझ्या तूं जिवाचें भाव जो हेलावला
अर्पिला मी तो तुला गे कोमलांगीं प्रेमिका !

## --कुमरी तूं तर !

कुमरी तूं तर लावण्याची
नांव आणखी गोड ' सुगंधा '
तुझेंच सखये वेड लागलें
तुझ्यावरी गे होय मी फिदा !

सुगंधा ! तुझ्या नयनिं नाचतें
मुग्ध प्रीतिचें नवखें पाणी
अन् माझ्या ओठांत रंगली
प्रणयाची गे अवखळ गाणीं !

धांवत येती भाव मधुर तव
मलयगिरींतिल जणुं वारे
अन् माझ्या हृदयाच्या गगनीं
लखलखले गे हंसरे तारे !

ठराव झाला तुझ्या नि माझ्या
नयनांचा गे अबोल कांहीं
प्रत्यय त्याचा कधीं यायचा—
हीच जिवाला झाली घाई

काव्य तूंच गे मम हृदयाचें
निशिदिनिं चिंतन तुझेंच चालें
तुझ्याकडे मन सतत धांवें
जाणशील का ध्यास प्रेमले ?

रमणी ! चल यें....स्वप्न रंगवूं
तुझ्या नि माझ्या आकांक्षांचें
होशिल का गे जीवन—साथी ?
वेड लागलें तव भेटीचें !

## -- अबोल तूं अन्....

तुझा नि माझा एकच ध्यास
तुझा नि माझा एकच श्वास
तुझ्या घरीं तूं....अन् माझ्या मी
बसलों टाकित नित निःश्वास!

तुझी नि माझी एकच प्यास
वेडहि एकच जरि दोघांस
तुझ्या घरीं तूं...अन् माझ्या मी
होउन बसलों हाय उदास!

काम सुचेना...धाम रुचेना
झोंप कशी ती येइन नयनां
चाहुलिच्या तव भासिं गुंतुनी
कळा लाविल्या अंतःकरणा!

जनापवादा बावरणारी
तूं तर कातर मुग्ध-किशोरी
तुझ्या घरीं तूं अन् माझ्या मी
म्हणून बसलों जणुं कांतारीं!

दुरून मज तूं कधीं बघावें
मीही आतुर तुला पहावें
असेंच कुठवर आपण सजणी
चकोरापरी व्यर्थ झुरावें?

अबोल तूं....अन् अबोल मीही
प्रेमभाव हृदयांतच वाही
प्रगट कधीं गे होइल गंगा—
राजापुरची मुग्ध लवलाही?

सुगंधा :--

वंचना का दो जिवांची ही अशी हो चालली
राजसा आतां सरू द्या भिन्नता दोघांतली
दो जिवांची एक भाषा, एक आशा, वेदना
मोहना! रोधूं विरोधा आण प्रेमें घेतली !

भिन्न जाती एक नातें बंधनें ना प्रीतिला
आपुला कां बंद व्हावा मार्ग प्रीती–राउळीं ?
ध्येय तुम्ही, श्रेय तुम्ही, प्राण तुम्ही या जिवा
केशवा! वांचूं कशी मी अंबुवीना मासळी ?

उद्धराया देह माझा धांवला तुम्ही जळीं
आगळी तेव्हांच भक्ती–प्रीत तुम्हां वाहिली
आपुल्यावीना कुणाला देह माझा वाहुं मी ?
होउं अन्याधीन कां मी ? वाढवूं का काहिली ?

आठवें? पुष्पांस घेतां हात होई कांपरा
चेहरा हो बावरा अन् प्रीत माझी हांसली
प्रीतिची प्रस्तावना ती; मुग्धतेनें बोलतां
स्पर्श होतां तीव्रतेनें वीज देहीं नाचली !

प्रीत माझी, नीत माझी निश्चला कीं मी सीत
ना गती तुम्हांविना हो मञ्जिवाला चांगली.
धोकणीनें, घोकणीनें जीव माझा भागला
प्रेमळा या प्रेमलेला या म्हणाया ' आपुली ' !

पत्रोपत्रीं वेळ दवडतां
अभ्यासाचा पारा थिजला
तीव्र काळजीमध्यें सुगंधा
फारच लागे झुरावयाला ३८

आणि शेवटीं धरीं बिछाना
कळी कोवळी म्लान जहाली
कमलमुखी अन् कोमलनयनीं
पुनव जाउनी आवस आली ! ३९

लिही आइला पत्र तातडीं
" मुकुंदाविना अशक्य जगणें
जरि न देशील अनुमति लग्ना—
भागच आहे यमास वरणें ! ४०

निकाल आई तुझ्याच हातीं
कारण तूं गे दैवत मजला
पांखर नसतां तुझ्या कृपेची
मृत्यु त्याहुनी भला, पुरवला ! ४१

ये ! आई ये ! घेइ कुशींत
रुग्णावस्थीं मी खाटेवर
आगमनाची वाट पाहतें
मुकुंदासवें येई लौकर ! ४२

पेंच प्रसंग

अनुक्रम ९८२८९
विभाग ...
क्रमांक ९२८८०
दि. २३।९।५४

झुळुक ११ वी

फिर्यादीची तारिख आली
मुकुंद मोरे करी तयारी
पुण्यपुरीला जाणें आलें
अन्यायावर करण्या स्वारी. १

गोरे मामावरती झाला
अब्रूनुकसानीचा दावा
कारण त्यानें मुकुंदावरी
केला होता कपटी कावा. २

"शठास व्हावें प्रतिशठ आतां"
निश्चय त्यानें उरीं बांधला
होता कारण मामा बोका
सुगंधावरी जणुं टपलेला. ३

या बोक्याला द्याया बडगा
मुकुंद न्यायालयीं निघाला
उदयिक तेथें लागायाचा
निकाल त्याचा पुण्यपुरीला. ४

तों ये तेथें सबाष्पनयनीं
वेणाईची करुणा मूर्ति
वदे उसासत "भीक मागतें
नासुं नका हो मम कुलकीर्ति !" ५

" नसेल अपुला दोष परन्तु
कन्या माझी तुम्हा भाळली
तुमच्या ध्यासें वेडी होउनि
पळें अंतिंची मोजुं लागली ! " ६

' काय करूं मी ? " मुकुंद बोले
" लिहा तिला कीं समजूतीनें
' तुजवर नाहीं माझी प्रीति
सुगंधा तुझें वृथाच झुरणें ' " ७

" जरि न बहकलों मी प्रेमानें
कसें वदूं हें मनास मारुन ?
उपाय तुमचा जरि मी केला
तगेल का ती झिडकारून ? ८

हीं घ्या पत्रें आणिक वाचा
काय करूं मी ? मजला कळवा
आज पुण्याला जात असें मी
तुम्हीच मुलिचें अंतर वळवा. " ९

' जरि न मुलीनें छंद सोडला
अशक्य आहे जगणें मजला ! '
वेणाईचें दुःख पाहुनी
मुकुंद मानसिं सचिंत झाला. १०

पेंच तिहेरी त्याला पडला
विचारसूत्रीं गुंता झाला
मार्ग यांतुनी सुटावयाला
सांपडेल का परमेशाला ? ११

ये इतक्यांतच तार तयाला
पुण्यपुरीहुन शैवागिरीला
' सुगंधास कुणि पळवुन नेलें !
असेल खचितच साताऱ्याला. १२

" तार कुणाची ? " उत्सुकतेनें
वेणाईनें त्याला पुसलें
तार वाचुनी मुकुंद बोले
" हें मामाचें कपटी जाळें !" १३

नको काळजी वार्ता खोटी
कोर्टी नच मी हजर रहावें
साताऱ्याला भटकत जावें
इंगित यांतिल, मज जिंकावें ! १४

चला हवेतर पुण्यपुरीला
कळेल तेथें सत्य तुम्हांला
सुगंधाकडे जावा तुम्ही
न्यायालयिं मी पाहिन खटला. १५

गेले दोघे पुण्यपुरीला
कोण कुणास्तव कुणास्तव कुणी.
मार्गामध्यें कुणि न बोलले
दिवस संपुनी जरि ये रजनी. १६

रुग्णालय दरवाजापाशीं
उभी करोनी वेणाईला
" सुगंधा किंव कोठें आहे ? "
अशी चौकशी करूं लागला. १७

कुणी दाविली त्याला खोली
— तिचा लागला होता डोळा
चोर पाउलीं परत जाउनी
घेऊनी येई वेणाईला. १८

" जातो आतां मम काजास्तव
येइन उदायिक सायंकाळीं
खटला आहे दोन वाजतां "
निघुन जाय तो जलद पाउलीं १९

प्रेमपत्र घेउनि छातिशीं
निजली होती रुग्ण कन्यका
म्लान मुखावर दिसे तियेच्या
प्रीतीस्तव धरलेला हेका ! २०

येई भानावरी सुगंधा
आणि विलगली वेणाईला
" मुकुंद कोठें ? मुकुंद कोठें ? "
आर्तपणानें धांवा केला. २१

कुशींत शिरुनी विगलित झाली
निःश्वासांचा सुरुं हो भाता
वेणाईनें पाठीवरुनी
हात फिरवला लव थरथरता. २२

थरारलें पण वेगें अंतर
चैत्रपालवी विशीर्ण देखुन
' वेल करपली ! तगेल कां ही ? '
एकच चिंता जाळी आंतुन ! २३

" मम ममतेचा कोंभ कोवळा
विकसित होवो जगन्नायका;
एकच आशा....एक मागणें
लीन, दीन मम भक्ती-हेका. " २४

करुणा भाके परमेशाची
मनोमनीं ती वृद्धा माता
मनास मारुन तनयेसाठीं
शरण जाय ती पूर्ण-अनंता. २५

एकच धागा तद् आशेचा
तो हि लागला तुटावयाला
जगायचें मग कोणासाठीं ?
विचार अंतिम तन्मनिं आला. २६

निश्चय करुनी बोले माता
" बाळ ! सुगंधा ! मनाप्रमाणें-
होउन जाइल; वेडे पोरी-
उघड नयन गे आनंदानें ! २७

अमृतवाणी पडतां कानीं
देहीं आली नव संजीवनि
खुले बालिका ! पुनश्च, मोदें-
कुशींत शिरली मिठी मारुनी ! २८

---

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

## झुळुक १२ वी

मामावरती डाव उलटला
बुडवा माणुस अंतीं बुडतो.
सहीसलामत मुकुंद सुटला
असा न्याय पण विरळा मिळतो १

आरोपांचें वाचन होतां
मुकुंद मागे त्यास पुरावा
कपटी मामा भुभुःकारले
कृष्णसर्प जणुं घेई चावा ! २

“ मुकुंद मोरे आहे लंपट
ऐसा शिक्षक समाजघातक
मम भगिनीच्या दीन मुलीला
मोह पाडुनि बनला प्रेमिक !” ३

“ कुठें असे ती तुमची भाची ?”
कोर्ट विचारी प्रश्न तयाला.
आणि अचानक येइ सुगंधा
कोर्टामाजीं त्या समयाला. ४

जिकडे तिकडे होय शांतता
रुग्ण कुमारी पुढती आली;
दृष्टिस भिडतां भेदक दृष्टि
मामाची तर गाळण उडली !

" ही मम भाची हिला विचारा. "
शंकित भावें वदले मामा.
प्रश्न ऐकुनी शांतपणानें
कुमारिनें त्या उत्तर दिधलें. ६

" मुकुंद मोरे शिक्षक माझे
प्रिय शिष्या मी आणिक त्यांची
परस्परावर झालों अनुरत
उठाठेव का या मामांची ? ७

लपटतेचा आळच नुसता
थोर खरोखर मुकुंद मोरे
चावट, कपटी, स्वार्थी, सोदे–
हे कनवाळू मामा गोरे ! ! ८

खुळया मुलाच्या गळीं बांधाया
माझ्यावर हे होते टपले
मुकुंद झाले तारक म्हणुनी
जीवन त्यांना मीच वाहिलें ! ९

भ्रमरवृत्तिचा माणुस लंपट
जो दुसऱ्यावर प्रेम लादतो
करा न्याय हो ! लंपट शोधा
मुकुंद मोरे का मामा तो? " १०

मामाचें कंबरडें मोडें
दंड तयाला जबर जहाला
मुकुंद नव्हता कठोर-हृदयी
दंड तयानें परताचि केला. ११

अन्यायाचें हो परिमार्जन
पुन्हां नोकरी कायम झाली
नोकरीहुनी श्रेष्ठ श्रेष्ठतर
न्याय, प्रीतिची जोड मिळाली! १२

फर्ग्युसनच्या टेकडीवरी
अत्यानंदें किबे नि मोरे
परस्परांचा हात धरोनी
फिरती जणुं कीं प्रणय-पांखरें! १३

---

## सुगंध-वारा:-

सुगंधा :- सुगंध-वारा सुटे साजणा
मुकुंद : सुगंध-वारा सुटे साजणी
सुगंधा :- स्वर्ग धरेला स्वामी शोभे
तुम्ही तसे मम धनी!

मुकुंद :- निळ्या नभांतिल माणिक-मोतीं
अगणित रत्नें तुझ्याचसाठीं
मी काव्यांतिल चंद्र तुझा गे
तू माझी रोहिणी!

सुगंधा :- नाहीं आभरणीं आसक्ति
हवी प्रीतिला विमला प्रीति
कौस्तुभ तुम्ही मम जीवाचे
मी तुमची हिरकणी !

मुकुंद :- तुझ्या प्रीतिची जोड लाभली
स्वप्नें गाहिरीं मूर्त भेटलीं
कातळावरी गा मधुगाणीं
जयांत संजीवनी !

सुगंधा :- तुम्ही वाजवा मधुर बासरी
मुग्ध करा मज लुब्ध बावरी
प्रीति-संगितीं रमवा कृष्णा
मी तुमची मोहिनी !

मुकुंद :- जगताच्या या उद्यानाची
...ानभूमी झाली साची
...ं फुलवुंया उल्हासाचीं
इथें सखे कमलिनी !

सुगंधा :- हात दिला मी तुमच्या हातीं
पडेल पाउल तुम्हां-मागुतीं
जिवा शिवाचें नातें जडलें
सख्या आजपासुनी !

* * *

REFBK-0008079